# माझा भारत

२८८३



BVBK-0402773

संजीवनी मराठे

बाल वाङ्मय विभाग
क्र. २६६३ दिनांक ९।८।९३
विषय बा. वा.

बा. वा.
२६६३
९।८।९

# माझा भारत

(काव्य प्रश्नमंजुषा)

(पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी उपयुक्त)

कवयित्री

**संजीवनी मराठे**

प्रश्नमंजुषा

**सुनीता कुलकर्णी**

BVBK-0402773

**स्नेहवर्धन प्रकाशन**

**पुणे.**

स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. २५

मुखपृष्ठ कल्पना : शिव-स्नेह

चित्रकार : रमेश भारताल

प्रकाशक :
श्री. एल. व्ही. तावरे
४ शारदा, पाषाण रोड,
अभिमानश्री सोसायटी समोर,
पुणे - ४११००८
दूरभाष : ३३४४४८ / ३३८६६६

© सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी १९९३

टाईपसेटिंग :
अक्षर विनायक,
कोरेगाव पार्क, पुणे १.

मुद्रणस्थळ :
हायलाईट प्रिंटर्स, पुणे

ISBN 81 - 85601 - 20 - 8

मूल्य: १२/- रुपये.

# अनुक्रमणिका


१. माझा भारत ! ........ १.

२. भारतभूमी ........ ३.

३. अमुचा देश ........ ५.

४. जय स्वतंत्रता ........ ७.

५. हिंदभूमिची अम्ही बालके ........ ९.

६. हे हिंदभूमिच्या प्राणा ! ........ ११.

७. स्वतंत्रते माउली ! ........ १३.

८. 'बापू ! तुमचे नित्य संस्मरण !' ........ १५.

९. ध्वज फडके अस्मानांत ........ १७.

१०. अशी आमुची माय मराठी ........ १९.

११. अमुचा भारतदेश ........ २१.

१२. अजुन जायचें पुढती ........ २३.

१३. उठा मुलांनो ! ........ २५.

१४. हिची कथा सांगते ........ २७.

१५. कळला नाही देव कुणा ........ २९.

२६६३ दिनांक ९।८।९३

मुलांनो,

या पुस्तकात एकूण पंधरा कवितांचा समावेश केलेला आहे. प्रत्येक कविता तुम्ही काळजीपूर्वक वाचा. कवितेशेजारील पानावर त्या कवितेवर आधारित अशी 'प्रश्नमंजुषा' दिलेली आहे. त्यातील प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्याय दिलेले आहेत. फक्त एकच पर्याय उत्तर म्हणून बरोबर आहे. अचूक पर्यायाची निवड तुम्ही करावयाची आहे. नंतर असा पर्याय दर्शविणाऱ्या अक्षराखाली रेघ मारा.

प्रत्येक प्रश्नाखाली दिलेले पर्याय तुम्हाला गोंधळून टाकणारे असेच दिलेले आहेत. कवितेचे वाचन आणि चिंतन तुम्ही जितके समरसतेने कराल तितका कवितेचा अर्थ तुम्हाला चांगला समजेल, आणि प्रश्नाचे अचूक उत्तर शोधणे तुम्हाला सहज शक्य होईल. अशातऱ्हेने जास्तीतजास्त उत्तरे बरोबर आणण्याचा प्रयत्न करा.

यामुळे तुमची आकलनशक्ती, बुध्दिकौशल्य तर वाढेलच, शिवाय आपल्या मायमराठीतील काव्याचा हा अमोल ठेवा सहजी मुखोद्गत होईल.

तुमच्या शाळेतील समारंभात भारतमातेचा अभिमान सांगणारी एखादी कविता धीटपणे तालासुरात म्हणून दाखवा. नक्कीच शाबासकी मिळवाल !

# १. माझा भारत !

माझा भारत, माझा भारत !

ऊन्ह, चांदणे, झुळझुळ वारा
इथे जळाची पावनधारा
उंच ढगांहुनि इथले पर्वत !

माया करितो सगळ्यांवरती
देव देतसे याच्या हातीं
आपुलकीची अमोल दौलत !

अंधारातिल दीपक होई
सुखशांतीची वाट दाखवी
जगा आवडे याची संगत !

याचीं मंगलगीते गाइन
सेवेसाठी तत्पर राहिन
याच्या पायीं वाहिन जीवित,

माझा भारत, माझा भारत

# प्रश्नमंजुषा : १. माझा भारत !

**(१) कवयित्री भारतातील पर्वत ढगांच्यापेक्षा उंच आहेत असे का म्हणते?**

(अ) पर्वत खरोखरच ढगांच्यापेक्षा उंच आहेत म्हणून.

(ब) भारतातील पर्वतांचा तिला अभिमान वाटतो म्हणून.

(क) भारतातील पर्वत दुरून हिरवेगार दिसतात म्हणून.

(ड) भारतातील पर्वतांवर घनदाट जंगल आहे म्हणून.

**(२) भारतमातेचे स्वत:च्या देशातील लोकांवर प्रेम आहे, कारण -**

(अ) भारतातील लोक भारतमातेवर प्रेम करतात.

(ब) भारतातील लोकांच्याजवळ 'अमोल दौलत' आहे.

(क) भारतातील लोकांना सुखशांती आवडते.

(ड) परमेश्वराकडून भारतमातेला प्रेमाचा अमोल असा ठेवा मिळाला आहे.

**(३) भारतमाता जगातील इतर देशांना शांततेचा मार्ग दाखविते, म्हणून -**

(अ) देव भारतमातेला आपुलकीची दौलत बहाल करतो.

(ब) सर्व देशात शांतता निर्माण होते.

(क) सर्व देश अंधारातील दीपक ठरतात.

(ड) सर्व देशांना भारताशी मैत्री करणे आवडते.

**(४) कवयित्री भारतमातेसाठी खालीलपैकी कोणता त्याग करावयास तयार आहे?**

(अ) याच्यासाठी जीवित समर्पित करणे.

(ब) सर्वांवर प्रेम करणे.

(क) मंगलगीतांची रचना करणे.

(ड) मंगलगीतांचे गायन करणे.

**(५) भारतमातेला 'अंधारातील दीपक' असे का म्हटले आहे, कारण -**

(अ) कारण भारतमाता संकटकाळात मार्गदर्शन करते.

(ब) कारण भारतमाता सुखाचा कानमंत्र सांगते.

(क) कारण भारतमातेच्या भूमीवर पवित्र जलधारा वाहतात.

(ड) कारण भारतातील पर्वत ढगांपेक्षाही उंच आहेत.

# भारतभूमी !

जिथे जन्मले रामलक्ष्मण
जिथे जन्मले कृष्णप्रभू
जिथे तथागत गौतम जन्मे
ती ही अपुली भारतभू !

प्रिय देवांचा अशोक राजा
धर्म जागवी जगावरी,
गोब्राह्मणप्रतिपालक जेथे
छत्रपती शिव राज्य करी.

राज्यरक्षणीं बाजी झुंजे
प्राणपणाने लक्ष्मि लढे,
दास्यमोचना जिथे झगडले
नेताजींचे सैन्य खडे.

सबळ इंग्रजां लावि पिटाळुन
जिथे महात्मा आत्मबळें,
उजळित चुकला पंथ जगाचा
जिथे जवाहर दीप खुले !

सुजला, सुफला, सश्यशामला
सुखदा, वरदा म्हणति जिला,
ती ही अपुली भारतभूमी,
प्रणामांजली वाहुं तिला !

## प्रश्नमंजुषा : २. भारतभूमी

**(१) कवयित्रीने या कवितेत ज्यांचा उल्लेख केला आहे त्या सर्वांसाठी खालीलपैकी फक्त एक सुयोग्य विशेषण निवडा.**

(अ) भारतवासी.

(ब) देशभक्त.

(क) लोकनेते.

(ड) भारतरत्न.

**(२) या कवितेत खालीलपैकी कोणत्या शूर, लढवैय्या स्त्रीचा उल्लेख केला आहे ?**

(अ) राणी लक्ष्मीबाई

(ब) राज्यरक्षणी

(क) सस्यशामला

(ड) प्रणामांजली.

**(३) नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने कोणते कार्य केले ?**

(अ) भारताला सबळ करण्याचे

(ब) भारतमातेला इंग्रजांच्या जुलुमापासून मुक्त करण्याचे.

(क) भारतमातेला चुकलेला 'पंथ' दाखविण्याचे.

(ड) भारतमातेला 'सुजला, सुफला' बनविण्याचे.

**(४) 'भारतमातेला आपण नमस्कार करू या' या अर्थाची ओळ खालीलपैकी कोणती ?**

(अ) "उजळित चुकला पंथ जगाचा"

(ब) "धर्म जागवी जगावरी"

(क) "प्रणामांजली वाहुं तिला"

(ड) "सुखदा - वरदा म्हणति तिला"

**(५) भारतमातेला 'सस्य शामला' असे म्हटले आहे, कारण -**

(अ) भारतातील लोक खूप श्रीमंत आहेत.

(ब) भारत धनधान्याने समृध्द आहे.

(क) भारतात हिमालयासारखे उंच पर्वत आहेत.

(ड) भारतात रामलक्ष्मणांचा जन्म झाला.

# अमुचा देश !

घरदारांहुनि प्रिय प्राणांहुनि अम्हांस अपुला देश
दिला तयानें अम्हांस सुंदर सेवेचा गणवेश.
अमुच्या कानीं थोरांचे घुमती मंगल बोल
अमुच्या ध्यानीं शूरांची परंपरा बहुमोल
संकटकाली प्रभु परमात्मा देइ अम्हां आदेश.
घरादारांहुनि -

जाळ भडकतां वैराचा अम्ही तिथें जाऊं
शांतीची अन् प्रेमाची ध्वजा तिथें लावूं
नसानसांतुनि अमुच्या खेळे ध्येयाचा आवेश.
घरादारांहुनि -

धरणीवर नांदेल अतां स्वतंत्र भारतखंड
भारतांत सद्धर्माची ज्योत जळेल अखंड
ती स्फूर्तीचे जगा दाखविल नित्य नवे उन्मेष.
घरदारांहुनि प्रिय प्राणांहुनि अम्हांस अपुला देश

# प्रश्नमंजुषा : ३. अमुचा देश

**(१) भारतमातेने लोकांना कोणता मंत्र दिला आहे?**

(अ) एकसारखा गणवेश घालण्याचा.

(ब) थोर लोकांची गाणी म्हणण्याचा.

(क) मनापासून दुसऱ्याची सेवा करण्याचा, मदत करण्याचा.

(ड) शूरवीरांप्रमाणे लढण्याचा.

**(२) भारतीयांनी खालीलपैकी कशाची आठवण ठेवली आहे?**

(अ) शूरवीरांनी गाईलेली मंगल गाणी.

(ब) शूरवीरांनी केलेले पराक्रम.

(क) भारतमातेवर शत्रूने केलेले हल्ले.

(ड) शूरवीरांनी गोळा केलेली संपत्ती.

**(३) जगाच्या पाठीवर कोठेही युध्द सुरू झाल्यास -**

(अ) भारतीय लोक तेथे सैन्य पाठवतील.

(ब) भारतीय लोक युध्दात पराजय होणाऱ्या देशाला आर्थिक मदत करतील.

(क) युध्दाकडे दुर्लक्ष करतील.

(ड) भारतीय लोक उभयदेशांना शांततेचा आग्रह धरतील.

**(४) कवयित्रीला आनंद का झाला आहे?**

(अ) भारतात युध्द झालेले नाही म्हणून.

(ब) जगाच्या पाठीवर 'भारत' एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे म्हणून.

(क) स्वतंत्र भारतात संपत्तीचे भरपूर साठे सापडले म्हणून.

(ड) भारतातील सर्व लोकांना अन्न, वस्त्र, निवारा मिळाला आहे म्हणून.

**(५) 'सध्दर्म' यातून कवयित्रीला कोणता धर्म अपेक्षित आहे?**

(अ) मानवता धर्म.

(ब) सहकार्याचा धर्म.

(क) युध्द करण्याचा धर्म.

(ड) आर्थिक मदत करण्याचा धर्म.

## ४. जय स्वतंत्रता !

जय स्वतंत्रता, नवभारत जय
नव्या युगाचा हा सूर्योदय

राष्ट्रप्रीतिचा, भक्तीचा जय
नवआशांच्या मुक्तीचा जय
नवक्षितिजावर उषा उधळिते
त्या सुखसुंदर तृप्तीचा जय.

बलशाली रणधीरांचा जय
कृतिवीरांचा, शूरांचा जय
भारतकीर्ती दिगंत नेती
विश्ववंद्य त्या नेत्यांचा जय.

जय साधूंचा, विद्वानांचा
कलाधरांचा, श्रमजीवींचा
पंचमहाभूतांचा जय हा
चिरविजयाचा हा नवगौरव

जय स्वतंत्रता, नवभारत जय.

# प्रश्नमंजुषा : ४. जय स्वतंत्रता !

(१) **या कवितेतील वर्णन कोणत्या वेळचे आहे ?**

(अ) भारतातील लोकानी स्वातंत्र्यासाठी लढा पुकारला तेव्हाचे.

(ब) भारताच्या सुवर्णकाळाची सुरवात झाली तेव्हाचे.

(क) भारतातील युध्दाचा शेवट झाला तेव्हाचे.

(ड) भारत पारतंत्र्यातून मुक्त झाला तेव्हाचे.

(२) **भारताच्या स्वातंत्र्याला कोणाची उपमा दिली आहे ?**

(अ) भक्तीचा जय.

(ब) नव्या युगाचा सूर्योदय.

(क) सुखसुंदर तृप्तीचा जय.

(ड) पंचमहाभूतांचा जय.

(३) **या कवितेत कवयित्रीने कोणाची स्तुतिस्तोत्रे गायिली आहेत ?**

(अ) सर्व धनवान व्यक्तिंची.

(ब) भारतदेशावर सत्ता गाजविणाऱ्या परकीयांची.

(क) भारतदेश सोडून जाणाऱ्या परकीय सत्तेची.

(ड) स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झगडणाऱ्या सर्व व्यक्तिंची.

(४) **'विश्ववंद्य नेता' याचा अर्थ कोणता ?**

(अ) सर्व जगाला वंदनीय असा नेता.

(ब) सर्व जगावर सत्ता गाजविणारा नेता.

(क) सर्व जगातील श्रीमंत असलेला नेता.

(ड) सर्व जगात श्रेष्ठ असलेला उद्योगपती.

(५) **"भारतीयांनी स्वातंत्र्य मिळविले", यातून भारतीयांचा कोणता गुण दिसून येतो ?**

(अ) देशभक्ती.

(ब) परकीयांची निंदा करणे.

(क) युध्दकौशल्य.

(ड) कलाप्रेम.

## ५. हिंदभूमिची अम्ही बालके -

हिंदभूमिची अम्ही बालके
देशाची जयगीते गाऊ
कर्तृत्वाने, बाहुबलाने
ध्वजा आपुली फडकत ठेवू.

हिंदभूमिची अम्ही बालके
साक्षर होऊं, सुजाण होऊ
कष्टसंकटे झेलत, पेलत
वाट यशाची चालत राहू.

हिंदभूमिची अम्ही बालके
ऐक्यासाठी कष्टत राहू
जातधर्म हे भेद मिटवुनी
राव रंक समसमान होऊ.

अम्हि देशाचे सुपुत्र, कन्या
हिंदभूमिचे नाव गाजवू
सत्यशांतिचा, मित्रत्वाचा
जगताला संदेश पोचवू!

2663

# प्रश्नमंजुषा : ५. हिंदभूमिची अम्ही बालके

**(१) या कवितेतील बालके कोणती प्रतिज्ञा करतात ?**

(अ) भारतमातेला पारतंत्र्यातून मुक्त करण्याची.

(ब) भारतमातेची सर्वांगिण प्रगती करण्यासाठी तत्पर राहण्याची.

(क) परकीयांना धडा शिकविण्याची.

(ड) सर्वांनी वृक्षारोपण करण्याची.

**(२) हिंदूभूमिची बालके स्वकर्तृत्वाने कोणती गोष्ट साध्य करणार आहेत ?**

(अ) संपूर्ण भारतभर असंख्य ध्वज फडकविणे.

(ब) श्रीमंत लोकांना अती श्रीमंत करणे.

(क) परकीयांच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी सैनिक बनणे.

(ड) भारतमातेचे स्वातंत्र्य अबाधित राखणे.

**(३) यश मिळवितांना बालकांना कोणत्या गोष्टींसाठी सामना द्यावा लागेल ?**

(अ) साक्षरता.

(ब) ऐक्य.

(क) कष्ट व संकटे.

(ड) मित्रत्व.

**(४) बालकांना कोणता भेद मान्य नाही ?**

(अ) समाजाच्या ऐक्यातील भेद.

(ब) मानव व प्राणी यातील भेद.

(क) जात व धर्म यातील भेद.

(ड) स्वकीय व परकीय यातील भेद.

**(५) हिंदभूमिची बालके जगाला कोणता संदेश देतात ?**

(अ) राव रंक यांच्यातील समानतेचा.

(ब) शांतता, समानता व बंधुतेचा.

(क) साक्षरतेचा.

(ड) देशभक्तीपर गीते गाण्याचा.

## ६. हे हिंदभूमिच्या प्राणा !

हे हिंदभूमिच्या प्राणा !
तुझा तिरंगा वेश मनोहर
सुखवि सदा जननयनां !

तू शांतीचा दूत, तुझा रे
निर्भयतेचा बाणा

ध्वजराजा, तुजमुळे जगामधि
उन्नत अमुच्या माना,

चंद्रसूर्य हे तुझे सोयरे
प्रिय तू देवगणांना,

दिशोदिशेतुन छेडित जासी
प्रेमसुखाची वीणा,

चिरसुंदर तू, चिरउन्नत तू
तू अवघ्यांचा राणा,

भरतभूमिचा मंगलमणि तू
प्रणाम तुझिया चरणां,
हे हिंदभूमिच्या प्राणा !

# प्रश्नमंजुषा : ६. हिंदभूमिच्या प्राणा

**(१) कवयित्री 'हिंदभूमिचा प्राणा' असे कोणाला उद्देशून म्हणते?**

(अ) चंद्राला.

(ब) भारतभूमीला.

(क) सूर्याला.

(ड) तिरंगी झेंड्याला.

**(२) तिरंगी झेंडा कवयित्रीला कसा दिसतो?**

(अ) गगनाला गवसणी घालणारा.

(ब) परकीय राष्ट्राला भय दाखविणारा.

(क) श्रीमंतीचे प्रतीक असणारा.

(ड) मनाला आनंद देणारा.

**(३) 'ध्वज प्रेमसुखाची वीणा छेडीत जातो' म्हणजे काय?**

(अ) देशातील सर्वांनी श्रीमंत बनून सुख मिळवावे असा संदेश देतो.

(ब) देशातील लोकांनी गुण्यागोविंदाने राहावे असा विचार ध्वज सर्वत्र पोहोचवितो.

(क) देशातील लोकांनी संगीतकलेत निपुण व्हावे असे सुचवितो.

(ड) वाद्यांचा राजा वीणा आहे हे सूचित करतो.

**(४) सूर्य चंद्र यांना तिरंगा झेंड्याचे मित्र असे म्हटले आहे, कारण -**

(अ) चंद्रसूर्यांप्रमाणे ध्वज लोकांना प्रकाश देतो.

(ब) सूर्यचंद्रांप्रमाणे ध्वज लोकांना आनंदित करतो.

(क) सूर्यचंद्रांप्रमाणे ध्वजसुध्दा आकाशात वास्तव्य करतो.

(ड) सूर्यचंद्रांप्रमाणे तिरंगा झेंड्याचे स्थान अढळ आहे.

**(५) हिंदभूमीचा प्राण असे तिरंग्यास कां म्हटले आहे?**

(अ) ध्वज देशातील लोकांना निर्भय बनवितो.

(ब) प्राण हे शरीराच्या चैतन्याचे तसे ध्वज हा राष्ट्राच्या चैतन्याचे प्रतीक आहे.

(क) ध्वज हा शत्रूपासून स्वकीयांचे रक्षण करतो.

(ड) ध्वज हा देशातील लोकांचे दु:ख हरण करतो.

## ७. स्वतंत्रते माउली !

स्वर्गाहुनि शीतल तुझी छत्रसाउली
जय तुझा भारतीं स्वतंत्रते माउली !

भाषांतुनि चवदा कोटि जनांच्या ओठी
उमटती अखंडित तुझ्या गुणांच्या गीती
विद्वान भिडविती तुझी दिगंता कीर्ती
भुलविती जगाला तुझ्या चरणचाहुली
जय तुझा भारती स्वतंत्रते माउली !

हे पहाड त्यांचे काळिज पाझरलेले
आभाळ पांढरे माथ्यावर लवलेले
घनदाट वने हीं - माळहि हिरवळलेले
विलसते तयांवर तुझी प्रभा आगळी
जय तुझा भारती स्वतंत्रते माउली

जे सत्य तयाचा येथे जयजयकार
जे मंगल त्याचा येथे नित आचार
जे सुंदर त्याचा येथे रुचिराकार
ही चिरंतनाची पूजा तुज पावली

जय तुझा भारती स्वतंत्रते माउली !

# प्रश्नमंजुषा : ७. स्वतंत्रते माउली !

(१) **कवयित्रीला भारतमाता कशी वाटते?**
(अ) अत्यंत शीतल.
(ब) 'छत्रसाउली' प्रमाणे.
(क) स्वर्गापेक्षा सुखकारक.
(ड) 'माउली' प्रमाणे.

(२) **भारतात एकूण किती भाषा बोलल्या जातात?**
(अ) कोटी.
(ब) चवदा.
(क) दिगंत.
(ड) सांगता येत नाही.

(३) **बुध्दिमान लोक भारतमातेची कशी सेवा करतात?**
(अ) भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी लढा देतात.
(ब) जगाला भुलविण्याचे काम करतात.
(क) भारतमातेचे अखंडपणे गुणगान करतात.
(ड) भारताची महती जगाला पटवून देतात.

(४) **'हे पहाड त्यांचे काळीज पाझरलेले' यातून कवयित्रीला काय सूचवावयाचे आहे?**
(अ) डोंगरातून अनेक नद्यांचा उगम होतो.
(ब) डोंगरात राहणारे लोक दयाळू आहेत.
(क) डोंगरातील सृष्टिसौंदर्य सर्वांना आवडते.
(ड) डोंगरातील दगडाना पाझर फुटतात.

(५) **खालीलपैकी कोणत्या गोष्टीची पूजा भारतात होत नाही?**
(अ) सत्याचा जयजयकार करणे.
(ब) मंगलदायक गोष्टींचा अंगिकार करणे.
(क) सर्व सुंदर गोष्टींचे कौतुक करणे.
(ड) पारतंत्र्यात राहण्याचा आग्रह धरणे.

## ८. 'बापू ! तुमचे नित्य संस्मरण !'

तुम्हीं लाविला अमुच्या दारी स्वतंत्रतेचा कल्पतरु
कसा फुलावा, कसा फळावा, कुणा कळेना - काय करुं ?

भूमी इथली शस्यशामला, पूर्ण जळाने नद्या येथल्या
भुकेजल्यांना घास पुरेना, किती श्रमांची धार धरुं ?

कुणी सजविती राजमंदिरे, कुणी रखडती वनी बिचारे
कुणी पलंगी, कुणी भुईवर, अशी विषमता कशी हरुं ?

कुणी घडविती, कुणी मोडिती, कुणी तोडिती, कुणी जोडिती
समन्वयाची वाट सुखाची सांगत त्यांना किती फिरुं ?

स्वधर्मपालन, सत्य आचरण, बापू ! तुमचे नित्य संस्मरण
प्रभुनामाने तुम्हा तारिले, तुमच्या नामें अम्ही तरुं.

करांत मंगल-दीप असावा, अम्हास अमुचा पंथ दिसावा
कल्पतरु हा बहरा यावा असे सुदैवी कधी ठरुं ?

तुम्ही लाविला अमुच्या दारी स्वतंत्रतेचा कल्पतरु ?
- स्वतंत्रतेचा कल्पतरु

## प्रश्नमंजुषा : ८. 'बापू ! तुमचे नित्य संस्मरण !'

**(१) स्वातंत्र्याला कवयित्रीने 'कल्पतरू' असे का म्हटले आहे ?**

(अ) स्वातंत्र्य मिळाले की देशातील लोकांची सर्व क्षेत्रात प्रगती करण्याची इच्छा पूर्ण होते.

(ब) स्वातंत्र्य मिळाल्यावर देशात वृक्षारोपण करता येते.

(क) स्वातंत्र्य मिळाल्यावर देशवासियांना खूप समाधान मिळते.

(ड) स्वातंत्र्य मिळाल्यावर देशातील लोकांचे दुःख नाहीसे होते.

**(२) भारतात धनधान्य भरपूर असुनही 'भुकेजल्यांना घास पुरेना' अशी परिस्थिती का निर्माण झाली आहे ?**

(अ) कारण भारतातील लोक अशिक्षित आहेत.

(ब) कारण भारतातील लोक निरोगी आहेत.

(क) कारण भारताच्या लोकसंख्येत भरमसाठ वाढ झाली आहे.

(ड) कारण भारतात पिकणारे अन्न जनावरांना खायला दिले जाते.

**(३) भारताला विषमतेचा कलंक लागला आहे हे कोणत्या ओळीवरून स्पष्ट होते ?**

(अ) कुणी पलंगी कुणी भुईवर.

(ब) किती श्रमांची धार धरु ?

(क) कुणी घडविती, कुणी मोडिती.

(ड) अम्हास अमुचा पंथ दिसावा.

**(४) 'समन्वयाची वाट' म्हणजे काय ?**

(अ) भारतीयांनी राजमंदिरे उभी करावीत.

(ब) भारतीयांनी महात्मा गांधींचे स्मरण करावे.

(क) भारतीयांनी खूप श्रम करावेत.

(ड) भारतीय लोकांनी एकमेकांशी पटवून घ्यावे.

**(५) कवयित्रीच्या मते भारतवासी सुदैवी केव्हा ठरतील ?**

(अ) कल्पतरूला बहर आल्यानंतर.

(ब) स्वातंत्र्याबरोबरच समतेचे व बंधुतेचे पालन केल्यानंतर.

(क) स्वातंत्र्याबरोबरच विषमता निर्माण झाल्यानंतर.

(ड) प्रत्येकाला आपला मार्ग दिसून आल्यानंतर.

## १. ध्वज फडके अस्मानांत !

ध्वज फडके अस्मानांत !
त्यास न गर्वाची बाधा
वेष करी सुंदर साधा,
चिमुकलाच हा दिसे, परी
लाखों हृदयीं राज्य करी,
ऐक्याचे मधुसंगीत
ध्वज गाई अस्मानांत !
निजलेल्यांना जागवितो
अपुल्याभवतीं दौडवितो
म्हणतो - 'मी तुमचा देव
द्या मजला निर्मल भाव.'
समानतेच्या स्वर्गांत
ध्वज फडके अस्मानांत !
मायकपाळा भूषवितो
भाग्यतिलक हा झगमगतो,
प्राणपणाने झगडूंया
ध्वज हा उन्नत राखूंया,
अक्षय सुखस्वातंत्र्यांत
ध्वज फडके अस्मानांत !

## प्रश्नमंजुषा : १. ध्वज फडके अस्मानांत !

**(१) भारताचा राष्ट्रध्वज फडकत असताना त्यातील रंगक्रम वरूनखाली कसा असतो ?**

(अ) हिरवा पांढरा नारंगी.

(ब) नारंगी पांढरा हिरवा.

(क) नारंगी हिरवा पांढरा.

(ड) पांढरा नारंगी हिरवा.

**(२) 'लाखो - हृदयीं ध्वज राज्य करतो' म्हणजे काय ?**

(अ) सर्व लोकांच्या हृदयात ध्वजाबद्दल प्रेमाचे स्थान असते.

(ब) सर्व लोकांच्यावर ध्वज अधिसत्ता गाजवितो.

(क) सर्व लोक ध्वजासमोर नतमस्तक होतात.

(ड) ध्वज असल्याखेरीज राज्य करता येत नाही.

**(३) ध्वज स्वत:ला देव का म्हणतो आहे ?**

(अ) ध्वज हा आकाशात उंच फडकतो आहे म्हणून.

(ब) ध्वजाचा रंग पांढरा आहे म्हणून.

(क) ध्वजाला गर्व झाला आहे म्हणून.

(ड) ध्वज हा राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहे म्हणून.

**(४) कवयित्रीने ध्वजाला कोणती उपमा दिली आहे ?**

(अ) मातेच्या कपाळावरील कुंकवाची.

(ब) पौर्णिमेच्या चंद्राची.

(क) आकाशात तळपणाऱ्या सूर्याची.

(ड) अलंकाराची.

**(५) कवितेच्या शेवटी कवयित्री कोणते आवाहन करते आहे ?**

(अ) अक्षय सुखात लोळत पडण्याचे.

(ब) प्राणाचीही पर्वा न करता देशाचे स्वातंत्र्य टिकविण्याचे.

(क) सतत एकमेकात प्राणपणाने झगडत राहण्याचे.

(ड) राष्ट्रध्वज अहोरात्र आकाशात फडकविण्याचे.

## १०. अशी आमुची मायमराठी !

भाषाभगिनींमधे साजिरी अशी आमुची माय मराठी
नित्यनव्याने खेळविते ती मंजुळगाणे अमुच्या ओठी

चक्रधरांनी, ज्ञानेशांनी लीळा, ओव्या तिला गायिल्या
एका, नामा, तुकया यांनी गौळण, गाथा तिज ऐकविल्या
दासांनी तर जागृत केला मराठबाणा तिचियासाठी
अशी आमुची माय मराठी.

संत पंत शाहीर घडविती अक्षरलेणी सुबक, मनोहर
काव्यनाटके नवलकथांचा हिच्या अंगणी घडतो संगम
लहानथोरा जवळ आणिते मनामनांची गुंफुन गाणी
अशी आमुची माय मराठी.

अपुली भाषा, अपुली आशा, विकास अपुला तिचिया हातीं
तिच्या मुखावर सुबोध सुंदर खुलत रहावी उज्वल कांती
वसा घेउया चिरसेवेचा, तिची करूया अनन्यभक्ती
भाषाभगिनींमधे साजिरी अशी आमुची माय मराठी !

# प्रश्नमंजुषा : १०. अशी आमुची मायमराठी !

**(१) या कवितेत कवयित्रीने कोणाची महती सांगितली आहे ?**

(अ) भाषा भगिनींची.

(ब) मराठी भाषेची.

(क) अनेक कवींची.

(ड) कवितेची.

**(२) जसे ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी तसे तुकाराम -**

(अ) लीळा.

(ब) मनाचेश्लोक.

(क) गाथा.

(ड) आरती.

**(३) संत रामदासांच्या काव्याचा लोकांवर कोणता परिणाम झाला ?**

(अ) लोकांच्या मनात मराठी भाषेविषयी अभिमान निर्माण झाला.

(ब) लोकाना कविता गुणगुणण्याची सवय लागली.

(क) लोकाना मराठी भाषा शिकण्याची इच्छा झाली.

(ड) लोक रामदासांना संत म्हणू लागले.

**(४) कवयित्रीने 'अक्षरलेणी' असे कशास म्हटले आहे ?**

(अ) सर्व भाषांमध्ये निर्माण झालेल्या साहित्याला.

(ब) निसर्गाचे वर्णन करणाऱ्या सर्व कवितांना.

(क) संताच्या सुंदर अक्षराला.

(ड) संत पंत आणि शाहीर यांच्या साहित्यरचनेला.

**(५) या कवितेत कवयित्रीने कोणते व्रत घेण्यास सांगितले आहे ?**

(अ) सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान धरावा.

(ब) सर्वांनी मराठीत काव्यरचना करावी.

(क) सर्वांनी मराठी भाषेतील साहित्य वाचावे.

(ड) सर्वांनी मराठी भाषेतील गाणी गावीत.

## ११. अमुचा भारतदेश !

वैरभावनाविरहित अमुचा भारतदेश असावा
ऐक्याचा नित सर्वत्रांनीं जयजयकार करावा.

वंश वेगळे पंथ वेगळे, वेगळेच आदेश
नकोत अमुच्या झेंड्याखाली भिन्नभिन्न गणवेश,

कोनाकोनामधून यावे सुपुत्र झेंड्याखालीं
महान त्यागानेंच व्हायचे भरतखंड बलशाली,

सहिष्णुता अंगांत बाणवा, निंदुं नका परक्यांस
सहकाऱ्यांवर जीवेंभावें राखा दृढ विश्वास,

गतकालांतिल भेदाभेदां विसरुनि जा मोदाने
जाते घडि ही अपुली साधा अभंग एकोप्याने,

कलह मिटावे, परस्परांतिल ऐक्यबीज रुजवावें
द्वेषाच्या विषवृक्षावरती प्रेमपुष्प विलसावे,

स्वदेशसेवेवाचुन दुसरा पंथ अम्हांस नसावा,
वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा.

## प्रश्नमंजुषा : ११. अमुचा भारतदेश

**(१) कवयित्रीने भारताबद्दल कोणते स्वप्न रंगविले आहे?**

(अ) एकमेकात प्रेम व बंधुभावना असलेला भारत देश.
(ब) वेगवेगळे पंथ असलेला भारत देश.
(क) सातत्याने आक्रमकवृत्ती धारण करणारा भारतदेश.
(ड) धनधान्याने संपन्न असणारा भारतदेश.

**(२) कवयित्रीच्या मते आदर्श समाज कोणता?**

(अ) वैरभावनेतून दुभंगलेला समाज.
(ब) प्रत्येक वंशाचा स्वतंत्र ध्वज असलेला समाज.
(क) वेगवेगळे पंथ; वंश असलेला समाज.
(ड) कोणताही भेदभाव नसलेला समाज.

**(३) भारतदेश सामर्थ्यवान कशामुळे बनणार आहे?**

(अ) लोकांनी देशासाठी केलेल्या महान त्यागामुळे.
(ब) लोकांनी सतत दुसऱ्या देशावर आक्रमण केल्यामुळे.
(क) देशात अमाप सैन्य व भरपूर शस्त्रसाठा असल्यामुळे.
(ड) देशातील लोक धनिक झाल्यावर.

**(४) भारतातील लोकांनी....**

(अ) सहिष्णुतेचे आचरण करावे.
(ब) परकियांची निंदा करावी.
(क) सहकाऱ्यांवर नेहमी विश्वास ठेवू नये.
(ड) गतकालातील भेदाभेद उकरून काढावेत.

**(५) सर्वांनी कोणत्या व्रताचे आचरण करावे?**

(अ) भरपूर धनधान्य पिकविणे.
(ब) भारताची मन:पूर्वक सेवा करणे.
(क) आकाशातील चंद्र, तारे यांचा शोध घेणे.
(ड) भजन - कीर्तनामध्ये रममाण होणे.

## १२. अजुन जायचें पुढती !

सवंगड्यांनों ! तुम्हास आहे
अजुन जायचे पुढती,
असोत काटे, असोत कुसुमे
तुमच्या वाटेवरती.

बाळमनांतिल स्वप्ने कोमल
बाळकरांतिल कला नि कौशल
अंकुरणाऱ्या आशांचें बल
एकवटुनिया उभी व्हायची
एक मनोरम वसती.

रहायला घर, वस्त्र अंगभर
अन्न पोटभर कष्टानंतर,
रंजन, शिक्षण सर्वांखातर
या वसतीची सदैव असतिल
एकदिलाची नाती.

विसरा भांडण, विसरा आळस
मने करा रे शुध्द निरागस
विचार असुं द्या, असुं द्या साहस
भविष्य अपुले रेखायाचे
तुम्हीच तुमच्या हाती.

सुदृढ कोणी, कुणी पांगळा
समर्थ कोणी, कोणी दुबळा
अजाण कोणी, कुणी शहाणा
सारे मिळुनी तयार व्हा रे
या पदयात्रेसाठी.

## प्रश्नमंजुषा : १२. अजुन जायचें पुढती !

(१) **या कवितेतील मुख्य आशय कोणता?**

(अ) संकटांवर मात करून आपली प्रगती साधली पाहिजे.
(ब) नेहमी संकटांचा मार्ग टाळून पुढे जावे.
(क) नेहमी सुखाच्या शोधाचा मार्ग अनुसरावा.
(ड) जीवनात नेहमी संकटांशी सामना करावा लागतो.

(२) **लहान मुलांच्या ठायी असलेल्या शक्तीची महती कोणती?**

(अ) या लहान मुलांच्या मनातील स्वप्ने अत्यंत नाजूक असतात.
(ब) ही लहान मुले कलाकार असतात.
(क) या लहान मुलांच्यातूनच एक आदर्श समाज बनणार आहे.
(ड) लहान मुले आशावादी असतात.

(३) **कवयित्रीच्या मनातील 'आदर्श वसतीचे' वैशिष्ठ्य कोणते?**

(अ) या वसतीतील सर्व जण एकमेकांचे नातेवाईक असतील.
(ब) या वसतीतील सर्वजण समान विचारांचे असतील.
(क) या वसतीतील सर्वजण एकाच घरात राहतील.
(ड) या वसतीतील सर्वजण लहान मुले असतील.

(४) **सवंगड्यांचे खरे शत्रू कोणते?**

(अ) निरोगी शरीर.
(ब) साहस आणि निर्भयता.
(क) निरागस मन आणि शुध्द विचार.
(ड) वैरभाव आणि आळस.

(५) **'पांगळा' या शब्दाचा अर्थ खालीलपैकी कोणता?**

(अ) पायाने अधू असलेली व्यक्ती.
(ब) डोळ्याने अधू असलेली व्यक्ती.
(क) हाताने अधू असलेली व्यक्ती.
(ड) कानाने ऐकू न येणारी व्यक्ती.

## १३. उठा मुलांनो !

उठा मुलांनो, चला मुलांनो, झोप उडू द्या डोळ्यांवरची
कशास वाया दवडायाची, नको ही कामाची वेळ गोमटी
उमटायाचे आहे सुंदर चित्र उद्याचे तुमच्या हातीं
फुला मुलांनो ! हसा मुलांनो !
सूर्य आजचा तुमच्यासाठी !

दूर करा जे तुम्हा अडविते, चूर करा जे तुम्हा तुडवितें
पूर येउंद्या कर्तृत्वाला, श्रमशक्ती तर तुमच्या हातीं
उठा मुलांनो, घडा मुलांनो,
घडी आजची तुमच्यासाठी !

जुन्यांतले घ्या वेचुन सोने, घडवा त्यांतुन नवीन लेणे
एकामेका देत सावली, लहानमोठे नांदा जवळी
उठा मुलांनो, झटा मुलांनो,
प्रेम आमुचे तुमच्यापाठी !

झोप उडू द्या डोळ्यांवरची, ही कामाची वेळ गोमटी
उठा मुलांनो — उठा.

# प्रश्नमंजुषा : १३. उठा मुलांनो !

**(१) कवितेतील मध्यवर्ती कल्पना कोणती?**

(अ) मुलांनी वेळ वाया दवडू नये.

(ब) मुलांनी आजचे काम नेहमी उद्या करावे.

(क) मुलांनी जून्या कल्पनांचा त्याग करावा.

(ड) आजची मुले उद्याचा देश घडवतील.

**(२) 'उद्याचे सुंदर चित्र' कोणते?**

(अ) मुलांनी स्वकर्तृत्वाने संपादन केलेले यश.

(ब) मुलांनी भल्या पहाटे उठणे.

(क) मुलांनी कामासाठी योग्य वेळेची निवड करणे.

(ड) मुलांनी फुलासारखे उमलणे.

**(३) मुलांनी कोणत्या गोष्टीचा प्रतिकार करावा?**

(अ) स्वतःच्या श्रमशक्तीचा.

(ब) स्वतःच्या कर्तृत्वाचा.

(क) जून्या, चांगल्या गोष्टींचा.

(ड) ध्येयपूर्तीच्या मार्गांत येणाऱ्या अडथळ्यांचा.

**(४) एकमेकांना आधार देत......**

(अ) सर्वांनी श्रमशक्तीचा वापर करू नये.

(ब) सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे.

(क) सर्वांनी आळशी बनावे.

(ड) सर्वांनी झोपून राहावे.

**(५) 'सूर्य आजचा तुमच्यासाठी' यातून कवयित्रीला काय सूचवावयाचे आहे?**

(अ) प्रत्येक नवीन दिवशी नव्या उत्साहाने काम करावे.

(ब) फक्त आजच तुम्ही काम करावे.

(क) सूर्य आकाशात तळपत असतानाच फक्त काम करावे.

(ड) मुलांनी फक्त दिवसाच काम करावे.

# १४. हिची कथा सांगते !

घरी आपुल्या माय मराठी वैभवात नांदते
बसा इथे, मी आज तुम्हाला हिची कथा सांगते.

हिच्या अंगणी मुले खेळती बोबडगाणी गात
ओटीवरती कामे करती कुशल जाणते हात
माजघरामधि रात्री भरतो सुरस कथेला रंग
कधी प्रगटतो राम तिच्यातुन, कधि नटतो श्रीरंग

अवीट गोडी वाटित फिरते हिची जेवणावळ
हरिनामामधि मिटून जाते हिच्या व्यथेची कळ
चुकले मुकले दीन गांजले हिचा तयां आसरा
भल्याभल्यांना देत दिलासा हिचा बोल हासरा.

काळोखाला वाट दावितो उजळ हिचा उंबरा
श्रमलक्ष्मी ही, हिच्या पूजने विकास येतो घरा
हिरवा करुनी साज हिंडते भाळी रेखुन चिरी
निर्भयतेची खुलते कांती लोभस मुखड्यावरी.

हिच्यासारखी हीच - हिचे घर - राणी ही सखिगणी
मनामनांतिल अनन्यतेची हिजला ओवाळणी
अशी सुखाने माय मराठी अपुल्या घरि नांदते
बसा इथे, मी आज तुम्हाला तिची कथा सांगते.

## प्रश्नमंजुषा : १४. हिची कथा सांगते !

**(१) या कवितेत कोणाची कथा सांगितली आहे ?**

(अ) कष्ट करणाऱ्या कुशल हातांची.

(ब) अंगणात बोबडगाणी गाणाऱ्या मुलांची.

(क) रंजलेल्या - गांजलेल्यांना आसरा देणाऱ्यांची.

(ड) मराठी भाषेच्या वैभवाची.

**(२) मोठी माणसे मुलांना कोणाच्या गोष्टी सांगतात ?**

(अ) चांदण्यातील जेवणावळींच्या.

(ब) राम – कृष्णाच्या.

(क) हसणाऱ्या मुलांच्या.

(ड) काळोख्या रात्रीच्या.

**(३) माणसाने आपले दु:ख हलके करण्यासाठी .....**

(अ) इतरांचे आनंदी चेहऱ्याने स्वागत करावे.

(ब) परमेश्वराच्या नामाचा जप करावा.

(क) पंचपक्वान्नांचे जेवण घालावे.

(ड) दु:खितांना दिलासा द्यावा.

**(४) जीवनातील निराशा ......**

(अ) श्रीमंतीमुळे नाहीशी होते.

(ब) निर्भयतेमुळे अधिक जाणवते.

(क) मराठीच्या ज्ञानामुळे नाहीशी होते.

(ड) दु:खाची मालिका तयार करते.

**(५) कवयित्रीच्या मते मराठी भाषेला घातलेली खरी ओवाळणी कोणती ?**

(अ) मराठी भाषेसारखी दुसरी श्रेष्ठ भाषा नाही असा विश्वास असणे.

(ब) मराठी भाषेत खूप कविता करणे.

(क) मराठी भाषेतील साहित्याचे वाचन करणे.

(ड) चेहऱ्यावर निर्भयता दाखविणे.

# १५. कळला नाही देव कुणा !

कळला नाही देव कुणा
राम म्हणा, कुणि रहिम म्हणा.

निराकार निर्गुण त्या मानुनि
कुणी तयाचे ध्यान धरा
कुणी उभारुनि सुवर्णमंदिर
प्रभुनामाचा गजर करा
कुणी तयाला नटवा सजवा
मोजित त्याच्या रूपगुणां
राम म्हणा, कुणि रहिम म्हणा.

सर्वांभूतीं निवास त्याचा
असे प्रवचनी कुणी म्हणा
निजभक्तांचा ईश्वर अंकित
भावसुलभ तो कुणी गणा
म्हणा - उमटल्या सुंदरतेवर
अद्भुत त्याच्या चरणखुणा
राम म्हणा, कुणि - रहिम म्हणा.

वसतो सृजनी, संहारातुनि
उषेनिशेमधि देव वसे
नि:श्वसितांतुनि मनभावातुनि
तो नितनूतन देव हसे
उरि न नांदला, करि न गवसला
आकृतीत जो तरि न उणा
राम म्हणा, कुणि रहिम म्हणा.

कळला नाही देव कुणा
राम म्हणा, कुणि रहिम म्हणा !

## प्रश्नमंजुषा : १५. कळला नाही देव कुणा

**(१) कवयित्रीच्या मते खरा देव कसा आहे?**

(अ) निराकार व निर्गुण.

(ब) सगुण व निर्गुण.

(क) विशिष्ट रूप धारण केलेला.

(ड) विशिष्ट नावे धारण केलेला.

**(२) परमेश्वराचे अस्तित्व कोठे असते?**

(अ) मंदिरात.

(ब) राजवाड्यात.

(क) सर्व प्राणिमात्रात.

(ड) डोंगर दऱ्यांमध्ये.

**(३) परमेश्वर हा कोणाचा दास बनतो?**

(अ) संतवचनांचे पाठांतर करणाऱ्या व्यक्तीचा.

(ब) परमेश्वराची मनापासून भक्ती करणाऱ्याचा.

(क) परमेश्वराला खूप दाग-दागिने अर्पण करणाऱ्याचा.

(ड) परमेश्वराची गाणी म्हणणाऱ्या भक्ताचा.

**(४) परमेश्वराचे अस्तित्व आपणास निश्चितपणे कोठे जाणवते?**

(अ) जेथे धनलक्ष्मी वास करते तेथे.

(ब) जेथे परमेश्वराच्या नामाचा गजर चाललेला असतो तेथे.

(क) जेथे भजन कीर्तनाचे कार्यक्रम चालू असतात तेथे.

(ड) जेथे सौंदर्याचा साक्षात्कार घडतो तेथे.

**(५) "देव हृदयातही सामावू शकत नाही आणि हातातही गवसत नाही" या अर्थाची ओळ कोणती?**

(अ) निराकार निर्गुण त्या मानुनि.

(ब) उरि न नांदला, करि न गवसला.

(क) उषेनिशेमधि देव वसे.

(ड) वसतो सृजनी, संहारातुनि.

क्र. ... 2663. दि. ... 28/4/93

BVBK-0402773

## स्नेहवर्धन प्रकाशनची दर्जेदार साहित्य निर्मिती

*************************************

१) दळवींची नाटके : एक अंतर्वेध - प्रा. स्वाती कर्वे. १२०/-
२) ज्ञानेश्वरीचे काव्यशास्त्र - डॉ.व.दि.कुलकर्णी. ४०/-
३) संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा - डॉ. काळे - श्री. नगरकर. ४५/-
४) मराठीचा भाषिक अभ्यास (ऐतिहासिक आणि वर्णनात्मक) - (सं) मु.श्री.कानडे. ६०/-
५) सुलभ भाषाविज्ञान - डॉ. द.दि.पुंडे. ३५/-
६) सांस्कृतिक मूल्यवेध - प्रा.रा.ग.जाधव. ४५/-
७) वछाहरण - (सं) डॉ. काळे - डॉ. पुंडे. ५०/-
८) मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास (१८०० ते १९२०) - (सं) डॉ. गं.ना.जोगळेकर. ४५/-
९) मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास (१९२० ते १९६०) - (सं) डॉ. गं.ना.जोगळेकर. ४५/-
१०) १९ व्या शतकातील प्रबोधनकार : विष्णु मोरेश्वर महाजनि (व्यक्ती आणि वाङ्मय) - डॉ. पुष्पा लिमये. ७५/-
११) आस्वाद विशेष (वैचारिक लेखसंग्रह) - माधव गोडबोले. ५०/-
१२) संतांची हे भेटी - (न.चिं.केळकर पुरस्कार) - डॉ. मु.श्री.कानडे. ९५/-
१३) ज्ञानेश्वरी व विसावे शतक - (सं) डॉ. स्नेहल तावरे. ६०/-
१४) साहित्याने मला काय दिले? - (सं) डॉ. तावरे - प्रा. दातार. ७५/-
१५) कालचक्र : एक नाट्याभ्यास - डॉ. वि.भा.देशपांडे. १२/-
१६) क्रौंचवध : एक आकलन - डॉ. लीला गोविलकर. १२/-
१७) मंथन : एक वैचारिक आलेख - डॉ. दत्तात्रय पुंडे. १२/.-
१८) चिरयौवन : एक काव्याभ्यास - डॉ. उमाशेखर वंडसे. १२/-
१९) ग्रीक पौराणिक कथा - प्रा.गो.वि.तुळपुळे. ५०/-
२०) यमुनापर्यटन - बाबा पदमनजी. ६०/-
२१) व्यक्तिमत्त्व विकास (आ.२री) - प्रा. आशा परुळेकर. ४०/-
२२) नेतृत्वाचे पैलू - प्रा.वा.ना.अभ्यंकर. ३२/-
२३) प्रदूषण - निरंजन घाटे. २२/-
२४) जीवदायिनी आणि इतर विज्ञानकथा - निरंजन घाटे. २५/-
२५) शास्त्रज्ञांच्या साहसकथा - डॉ. प्र.न.जोशी. २०/-
२६) शिक्षणाचे शिल्पकार : कर्मवीर भाऊराव पाटील - डॉ. पंजाबराव जाधव. २०/-
२७) मराठी अक्षर लेखन - डॉ. कल्याण काळे. १२/-
२८) आभाळाचा फळा - डॉ. नीलिमा गुंडी. १५/-
२९) पक्षीमित्र - डॉ. मंदा खांडगे. १४/-
३०) आयुष्याला शिस्त असावी - प्रा. आशा परुळेकर. १४/-
३१) मुलांचे खेळ आणि कला - प्रा. आशा परुळेकर. ४०/-
३२) खसखसपुरचे चार बहादूर - कमल राजाज्ञा. १८/-
३३) आपली ज्ञानेंद्रिये - डॉ. शंतनु चिंधडे. १८/-
३४) माझा भारत (काव्य प्रश्नमंजुषा) - संजीवनी मराठे. १२/-
३५) बौध्दिकचाचणी - सुनीता कुलकर्णी. १२/-